शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना अत्युत्कृष्ट कामाबद्दल आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्याबाबत....

73

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक: आवेवा-१०९२/प्र.क्र.५९/९२/आठ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ५ नोव्हेंबर, १९९२.

संदर्भ :- [१] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-१०६९/डी, दिनांक २६ जून, १९७०.
[२] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एसआरव्ही-१०७२/डी, दिनांक ११ फेब्रुवारी, १९७४.
[३] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-१०८१/१४३३/प्र.क्र.११९/आठ, दिनांक २४ डिसेंबर, १९८१.
[४] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-१०८९/२८२९/प्र.क्र.४०६/आठ, दिनांक ४ एप्रिल, १९९०.
[५] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: आवेवा-१०८९/४४/प्र.क्र.१३/आठ, दिनांक २ जून, १९९०.
[६] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: आवेवा-१०९०/प्र.क्र.१५२/आठ, दिनांक २९ ऑक्टोबर, १९९०.

जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी.
12 DEC 1992

शासन निर्णय :- कर्मचा-यास/अधिका-यास पाच वर्षात एकापेक्षा जास्तवेळा आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्यात येवू नयेत, असे आदेश उपरोक्त दिनांक २६ जून, १९७० च्या परिपत्रकान्वये देण्यात आले आहेत. तसेच आगाऊ वेतनवाढ मंजूर करण्याच्या दिनांकात एकवाक्यता रहावी यादृष्टीने प्रतिवर्षी आगाऊ वेतनवाढ मिळण्यासाठी दिनांक १ ऑक्टोबर हा दिनांक निश्चित करण्यात आलेला आहे. अशा परिस्थितीत उपरोक्त पांच वर्षाची गणना कशा प्रकारे करण्यात यावी, असा प्रश्न कांही विभागांनी उपस्थित केला होता. त्याबाबत सम्यक विचार करुन पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे:-

[अ] सदरहू पांच वर्षांची गणना गोपनीय अभिलेख वर्षाप्रमाणे करण्यात यावी. उदा. दिनांक १ ऑक्टोबर, १९८५ रोजी आगाऊ वेतनवाढ मंजूर केलेल्या अधिकारी/कर्मचा-यांचे सन १९८५-८६, १९८६-८७, १९८७-८८, १९८८-८९ आणि सन १९८९-९० या पुढील पाच वर्षांचे गोपनीय अभिलेख उपलब्ध झाल्यावर असा अधिकारी/कर्मचारी पुनः आगाऊ वेतन वाढीसाठी विचारार्थ पात्र समजण्यात यावा.

[ब] ज्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना आगाऊ वेतनवाढी देण्याचा प्रस्ताव विचाराधीन असेल त्यांची संख्या जर संवर्गनिहाय विहित कमाल ५ टक्के प्रमाणापेक्षा जास्त असेल व जर त्यावेळी त्या कर्मचा-याच्या/अधिका-याच्या गोपनीय अभिलेखांची/अहवालांची प्रतवारी सारखीच असेल तर अशावेळी कशाप्रकारे कार्यवाही व्हावी, त्याबाबतचे स्पष्टीकरण उपरोक्त दिनांक २९ ऑक्टोबर १९९० च्या आदेशातील परिच्छेद क्रमांक १ [३] मध्ये करण्यात आले आहे. त्याबाबत आता पुढीलप्रमाणे सुधारीत आदेश देण्यात येत आहेत :-

[कृ.मा.प.]

ज्या शासकीय कर्मचा-यांना / अधिका-यांना आगाऊ वेतनवाढी देण्याचा प्रस्ताव विचाराधीन असेल त्यांची संख्या जर संवर्गनिहाय विहित कमाल ५ टक्के या प्रमाणकापेक्षा जास्त असेल व जर त्यावेळी विचारार्थ सेवकाची गोपनीय अभिलेखांची प्रतवारी सारखी असेल तर तुलनेत अलीकडे ज्या सेवकांना आगाऊ वेतनवाढीचा फायदा मिळालेला नाही, त्यांचा ज्येष्ठतेनुसार आगाऊ वेतनवाढी देण्याकरिता विचार करण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

य. मा. जोशी,
उप सचिव,
महाराष्ट्र शासन.

प्रति,